

५) कविता - शिर्षक - जागच्या जागी

गरगर गर फिरणारा पंखा
स्तब्ध आहे जागच्या जागी
खुर्च्या आतल्या खाली खाली
एकाकी झालीय आताशा खोली ॥

माणसे घरातली नाही एका जागी
होते ते, झाली झाली पांगापांगी
उजाड भकास होऊन बसले हे
भरलेले घर आता जागच्या जागी ॥

हश्या - टाळ्यां, मुक्त ते बागडणे
सुख-दु:खाच्या आठवणी सोहळ्या
मानवतीच्या जणू गर्द सावल्या
जुने दिवस थिजले जागच्या जागी ॥

सांभाळता येत नाही संलित मन
मोल त्याचे कधी उमजत नाही
वेळ होतो पसार हळू बोजर पाकळी
जणू थिजलेले तसेच जागच्या जागी ॥

— o —

- कवी -
अरुण वि. देशपांडे
पाटील नगर, बावधन (बु.), पुणे-२१,
मोबा. 9850177342